<u>आगामी विधानसभा निवडणूक - २०१९</u>
आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग, मंत्रालय,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ९८/अर्थसंकल्प-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६ सप्टेंबर, २०१९.

<u>परिपत्रक</u> :-

आगामी विधानसभा निवडणूक, २०१९ च्या कार्यक्रमाची घोषणा भारत निवडणूक आयोगाने दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ रोजी केलेली असून, त्यानुसार सदर निवडणूकीची आदर्श आचारसंहिता संपुर्ण राज्यामध्ये दिनांक २१ सप्टेंबर, २०१९ पासून लागू झालेली आहे.

२. वित्त विभागाकडे सर्व संबंधित प्रशासकीय विभागांकडून मोठ्या प्रमाणावर निधी वितरण/ पुनर्वितरण/ पुनर्विनियोजन यांस सहमती दर्शविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त होत आहेत. सदर प्रस्तावांना नियमित कार्यपध्दतीनुसार (Routine Procedure) वित्त विभागामार्फत सहमती / अभिप्राय देण्यात येतील. परंतु असे असले तरी दि. २१ सप्टेंबर, २०१९ पासून आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने राज्यामध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली असल्याने, तिचे काटेकोरपणे पालन करणे व आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची खात्री करुन विभागाने पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. सबब सर्व प्रशासकीय विभागांना या परिपत्रकान्वये सूचित करण्यात येते की, **<u>प्रस्तावांना वित्त विभागाची नियमित पध्दतीने सहमती प्राप्त झाली असली तरी प्रत्यक्ष पुढील आदेश निर्गमित करतांना किंवा पुढील कार्यवाही करतांना निवडणूक आयोगाने तसेच सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेचे पालन होत आहे ही खात्री करण्याची दक्षता विभागांनी घ्यावी.</u>**

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९२६१५५७२०३३०५ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant K. Patil

Digitally signed by Vasant K. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=56462e610dbf070fe5eefa98886b167556f80b373181ed680e4c9c879d7e3617, serialNumber=14caf70544d4d2fb25d1da6ed673b0488e940d807179c09470fcdd9192ba4ce7, cn=Vasant K. Patil
Date: 2019.09.26 15:59:06 +05'30'

(व . कृ. पाटील)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व सह सचिव / उपसचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व सह सचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. निवड नस्ती, अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.